FORM-1 A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. ९३, वर्ष Year २०२३, दिनांक Date २५/०३/२०२३

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शनिवार, तारीख पासून Date from २५/०३/२०२३, वेळ Time १५:३०, तारीख पर्यंत Date to २५/०३/२०२३, वेळ Time १८:१०
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date २३/३/२०२३, वेळ Time १२:३०
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०४/२०२३, तारीख Date २५/०३/२०२३, वेळ Time ००:४५

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रार अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ...........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ..........., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name धारावी पो. ठाणे, ठिकाणाचे नंबर No. if any इमारतीच्या पहिल्या मजल्यावर रूम नं. १ मध्ये, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place धारावी मुंबई, गाव Village ४०००१७, पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name नवाब अन्सारी (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name अब्दुल समद
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age २८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 7045400017
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........., (f) व्यवसाय Occupation ...........
   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता : Address : ..........., गल्ली / सर्वे नं. Ward ..........., घर / नाव नंबर House/Name No. ..........., फोन /मो. नंबर Phone/M. No. ..........., पॅन नं. Pan No. ..........., वोटर्स नं. Card No. ...........
   रस्त्याचे नाव Road रू.नं. ६०५, न्यू महाराष्ट्र बिल्डींग, के.के. मेनन मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.
   तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   कॉन्स्टेबल विजय शिवदास माने वय ५३ वर्षे धंदा: नोकरी पद पोलीस शिपाई नेमणूक : धारावी पोलीस ठाणे मुंबई, रा. सी. २ बी. रू.नं. ३०४, सांताक्रुझ नविन पोलीस वसाहत, वायरलेस कम्पाऊंड, रुझ गार्डन जवळ सांताक्रुझ (प) मुं ४०००५४

फिर्यादी                दि. 25/03/2023

फिर्यादी श्री नबाब अब्दुल समद अन्सारी वय २८, वर्षे धंदा व्यवसाय रा. ठि. रु. नं. ६०५ न्यु महाराष्ट्र बिल्डींग, के. डे. मेनन मार्ग, ९० फिट रोड, धारावी, मुंबई ४०००१७ यांचा सविस्तर जबाब मराठीत टंकलिखीत करण्यात आला असुन तो सोबत जोडण्यात आला आहे. त्या गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात आली आहे.

समक्ष

(संतोष गुर्जर)
पोलीस निरीक्षक
भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग मुंबई

फिर्याद दि. २४/०३/२०२३.

श्री. नवाब अब्दुल समद अन्सारी, वय २७ वर्षे, धंदा – रेशनिंग दुकान, रा.ठि. रुम नं. ६०५, न्यु महाराष्ट्र बिल्डींग, के. के. मेनन मार्ग, ९०, फीट रोड, धारावी, मुंबई – ४०० ०१७, मोबाईल नं. ७०४५४०००१७.

---

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मागील १६ वर्षापासून माझे कुटूंबीयांसह राहावयास आहे. मी रेशनिंगचे दुकान चालवित असून त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

मी दिनांक ०२/०२/२०२२ रोजी श्री. अशफाक शेख नामक व्यक्तीकडून रुम क्र. जीएनएस/९५/२४१, धारावी, मुंबई येथे १० बाय १४ फुट रुमचे रिपेअरींग करण्याचा ठराव केला. परंतू श्री. अशफाक शेख यांचे अकस्मात निधन झाल्याने त्यांचे मुलाकडे पैसे नसल्याने त्यांनी मलाच माझेकडील पैसे वापरुन रिपेअरिंग करण्यास सांगितले. मी माझेकडील १२ लाख रुपये खर्च करुन सदरची रुम रिपेअरिंग करुन तेथे पागडी सिस्टममध्ये भाडोत्री ठेवले. नमूदबाबत अशपाक शेख यांच्या पत्नी सौ. शमीम बानु यांचेसोबत करारनामा करण्यात आला आहे. जोपर्यंत मला सदरची रुम रिपेअरिग करण्याकरीता जितका खर्च आला आहे तेवढी रक्कम मला परत मिळेपर्यत मी सदरची रुम जास्त डिपॉजिट घेऊन भाडयाने ठेवू शकतो असे ठरविण्यात आले. सदरबाबत मी भाडोत्री यांचेसोबत करारनामा केला आहे.

दि. १६/११/२०२२ रोजी धारावी पोलीस ठाणे, मुंबई येथे श्री. अशफाक शेख यांचा मुलगा सोहेल आणि जावेद शेख यांनी माझ्या व माझ्या आई श्रीमती रजिया सुल्तान हिचे विरोधात गु.र.क्र. १२८६/२०२२, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८ व ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल केला. त्या केसमध्ये मला बांद्रा कोर्टाकडून दि. १८/११/२०२२ रोजी जामीन देत दोन महिन्यापर्यंत प्रत्येक आठवडयाच्या शुक्रवारी धारावी पोलीस ठाणे येथे हजेरी देण्याचे आदेश दिले. त्या आदेशानुसार मी व माझी आई असे आम्ही दोघेही प्रत्येक आठवडयाचे प्रत्येक शुक्रवारी धारावी पोलीस ठाणे येथे हजेरी देत होतो.

दि. २७/०९/२०२२ रोजी मी घेतलेल्या वर नमूद रूममध्ये भाडोत्री ठेवण्यासाठी स्मॉल कॉज कोर्ट येथे सुट नं. एल. डी. १२५/२२ दाखल केले होते. दि. ०४/०३/२०२३ रोजी स्मॉल कॉज कोर्टाने माझा अर्ज मंजुर करून भाडोत्री ठेवण्याकरीता परवानगी दिली. नमूदची कॉपी मी धारावी पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी श्री. सोनवणे यांना दिली. त्याप्रमाणे मी माझी रुम एका व्यक्तिस भाडयाने दिली.

दि. १८/०३/२०२३ रोजी माझे रुममध्ये राहत असलेले भाडोत्री यांना धारावी पोलीस ठाणेतील अधिकारी/कर्मचारी जबरदस्तीने रुमबाहेर काढून पोलीस ठाणे येथे घेऊन गेले व तेथे पोलीस अधिकारी श्री. सोनावणे यांनी माझ्या भाडेकरूला मारहाण देखील केली. त्यामुळे पोउनि सोनावणे यांना मी भेटलो असता, त्यांनी मला, ''तु नंतर भेट पहिला माझ्या वरिष्ठांना भेट असे सांगितले. सदर घटनेची माहिती मी धारावी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना फोनद्वारे दिली परंतु ते रजेवर असल्यामुळे त्यांनी प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय माने यांना भेटण्यास सांगितले. त्यानुसार मी पो.नि. विजय माने यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, तुझ्यावरील लागलेल्या कलमांपैकी कलम ४२० ठेवून इतर कलमे मी काढू शकतो. परंतु त्याकरीता मला रु १,००,०००/– किंवा आयफोन तुला दयावे लागेल.

मला लोकसेवक पो.नि. माने व पोउनि सोनावणे यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने मी दिनांक २३/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार दिली. माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता ला.प्र.विभागाकडून पो.नि. संतोष गुर्जर व पर्यवक्षक अधिकारी सपोआ उमेश पाटील यांना नेमण्यात आले. त्यावेळी पो.नि. संतोष गुर्जर यांनी माझ्या तक्रारीप्रमाणे माझा अर्ज संगणकावर हिंदीमध्ये टंकलिखीत करून तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करून मी सही करून दिला.

पो.नि. गुर्जर यांनी दोन शासकीय पंचाना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. दोन्ही शासकीय पंचाना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला. तो त्यांनी वाचून त्यावरी दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून पो.नि. गुर्जर यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मी दिलेल्या तक्रारीची पंचांसमक्ष धारावी पोलीस ठाणे, मुंबई येथील पोलीस उप निरीक्षक सोनावणे, पो.नि. विजय माने यांची प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान मला योग्य त्या सुचना व माहिती दिली. त्यानंतर पो.नि. गुर्जर हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. गुर्जर यांनी स्वत:चे, माझे, व पंचाचे वक्तव्य रेकॉर्डीग केले. त्यानंतर पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मी व पंच संदेश चव्हाण असे मी आणलेल्या दूचाकी वाहनाने व पंच क्र. ०२ व पडताळणी पथक असे शासकीय वाहनाने पडताळणीसाठी रवाना झालो

आम्ही दूचाकीवर असल्यामुळे आम्ही प्रभादेवी, दादर, मांटुगा मार्ग सायन हॉस्पीटल येथे थाबंलो. तर शासकीय वाहने, वरळी सी फेस, सी लिक मार्गाने, कलनगर जक्शंन, धारावी मार्गे सायन हॉस्पीटल, मुंबई येथील वाहन पार्किग जागेमध्ये कोणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे वाहने थांबविली.

त्यांनतर पो.नि. गुर्जर यांनी मला व पंच श्री. संदेश चव्हाण यांना पडताळणी बाबत योग्य त्या सुचना देवून त्यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तो मी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. चव्हाण असे मी आणलेल्या दूचाकी वाहनाने धारावी पोलीस ठाणे येथे लोकसेवक यांना भेटण्यासाठी गेलो. सदर दिवशी माझी लोकसेवक पो.नि. माने यांची भेट झाली. सदरवेळी लोकसेवक यांच्याशी माझ्या विरूध्द दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने चर्चा झाली तसेच मी सोबत आणलेले मूळ कागदपत्रे त्यांनी त्यांच्याकडे ठेवली. परंतु त्यांच्याकडे भेटण्याकरीता इतर लोक येत असल्यामुळे त्यांनी मला याविषयावर नंतर बोलू असे सांगितल्याने मी व पंच दोघेही पुन्हा शासकीय वाहनाजवळ परत आलो. त्यावेळी पो.नि. गुर्जर यांना लोकसेवक यांच्या सोबत झालेल्या चर्चेबद्दल सांगितले. त्यावेळी सपोआ पाटील व पोनि गुर्जर यांनी चर्चा करून सदर पडताळणी लोकसेवक यांनी संपर्क करेपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आली.

दिनांक २३/०३/२०२३ रोजी सुमारे २०.१० वा. पोउनि सोनावणे यांनी त्यांचा मोबाईल क्र. ८१०८२२२७४३ या नंबर वरून माझ्या मोबाईल क्र. ७०४५४०००१७ या नबरं फोन करून लोकसेवक पो.नि. माने यांच्याशी फोनवर बोलण्यास सांगितले. त्यामुळे मी माझ्या मोबाईल क्र. ७०४५४०००१७ वरून लोकसेवक पो.नि. माने यांच्या मोबाईल क्र. ९८२११६१३७५ या नबरंवर व्हॉटसअप् कॉल केला. त्यावेळी त्यांनी मला दिनांक २४/०३/२०२३ रोजी दुपारी भेटण्यास सांगितले. त्यामुळे मी लागलीच पो.नि. गुर्जर यांना त्याबाबत माहिती दिल्याने त्यानी मला सकाळी ला.प्र.वि. कार्यालयात येण्यास सांगितले.

पो.नि. गुर्जर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक २४/०३/२०२३ रोजी ला.प्र.वि कार्यालयात हजर झालो. त्यानंतर ते मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. गुर्जर यांनी स्वत:चे, माझे, व पंचाचे वक्तव्य पुन्हा रेकॉर्डीग केले. त्यांनतर पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मी व पंच संदेश चव्हाण असे मी आणलेल्या दूचाकी वाहनाने व पंच क्र. ०२ व पडताळणी पथक असे शासकीय वाहनाने पडताळणीसाठी रवाना झालो.

आम्ही दूचाकीवर असल्यामुळे आम्ही प्रभादेवी, दादर, माटुंगा मार्ग सायन हॉस्पीटल येथे थाबंलो. तर शासकीय वाहने, वरळी सी फेस, सी लिक मार्गाने, कलानगर जक्शंन, धारावी मार्गे सायन हॉस्पीटल, मुंबई येथील वाहन पार्किंग जागेमध्ये कोणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे वाहने थांबविली.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला व पंच श्री. संदेश चव्हाण यांना पडताळणी बाबत योग्य त्या सुचना देवून त्यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तो मी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. चव्हाण असे मी आणलेल्या दूचाकी वाहनाने धारावी पोलीस ठाणे येथे लोकसेवक यांना भेटण्यासाठी गेलो. सदर दिवशी माझी लोकसेवक पो.नि. माने यांचेशी भेट झाली.

सदरवेळी लोकसेवक यांच्याशी माझ्या विरूध्द दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने पुन्हा चर्चा करते वेळी लोकसेवक पो.नि. माने यांनी असे सागितले की, क्या लाया है तु... त्यावेळी मी त्यांना असे नमुद केले की, आय फोन मत लो कुछ थोडा बहोत ले लो... आय फोन कितने का आता है... त्यावेळी लोकसेवक पो.नि. माने यांनी असे नमुद केले की, तेरे को मिलता तो भी है पच्चास साठ हजार... त्यावेळी मी असे नमुद केले की, अभी पाच छे दुगां तो आप नाराज हो जावोगे... त्यावर लोकसेवक यांनी 'हा ' असे नमुद केले त्यामुळे मी असे नमुद केले की, लेकिन सुनो ना साहब... पच्चास साठ से थोडा निचे ही दुंगा थोडा दस और कम करो जरा... चालीस तक का प्लिज... त्यावेळी लोकसेवक यांनी असे नमुद केले की, चलेगा ठिक है... ठिक है... असे नमुद केले. त्यानंतर मी व पंच श्री. चव्हाण असे शासकीय वाहनाजवळ आलो. पोनि गुर्जर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. माझेकडे लोकसेवक पो.नि. माने यांनी माझे कामासाठी रु ४०.०००/- लाचेची मागणी केल्याचे खात्री झाली.

सदर ठिकाणी परत आलेनंतर पो.नि. गुर्जर यांनी झालेल्या हकिकतबाबत विचारणा केली त्यावेळी लोकसेवक पो.नि. माने यांनी रु ४०,०००/- इतक्या लाचेची मागणी केलेबाबत सांगितले. त्याबाबत व्हॉईस रेकार्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन त्याबाबतची खात्री झाल्यानंतर लागलीच सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यांनतर मला सापळापूर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावून सांगितली व मला कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला लोकसेवक पो.नि. माने यांना दयावयाचे रु

समक्ष,

( संतोष कमलाकर गुर्जर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

NAWAB ANSARI

४०,०००/– (अक्षरी रु चाळीस हजार फक्त ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझेकडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु ५००/– दराच्या ८० नोटा एकुण रु ४०,०००/– (अक्षरी रु चाळीस हजार फक्त ) त्यांचेकडे दिले. माझी पचांसमक्ष अंगझडती घेण्यात आली. माइया जिन्स पॅन्टच्या पुढील बाजूच्या उजवा खिसा वगळून इतर खिश्यामध्ये माझे अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या वस्तू पो.नि. गुर्जर यांनी त्यांच्याकडे ठेवल्या.

तद्नंतर पो.नि. गुर्जर यांनी सापळा पथकातील अमंलदाराच्या मदतीने कागदावर नमुद नोटाचे नबंर नोंद केले. नंतर नोटाच्या दोन्ही बाजूस चालक श्री. सय्यद यांनी अॅन्थ्रेसिन पावडर लावून नोटा एका प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवून सदर रक्कम माइया जिन्स पॅन्टच्या पुढील बाजूच्या उजव्या खिशात पंचासमक्ष ठेवली.

पो.नि. गुर्जर यांनी मला व पंचाना तसेच सापळा पथकातील अमंलदाराना सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाईबाबत सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक पो.नि. माने यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर पो.नि. गुर्जर यांना मोबाईल फोनमधील व्हॉटसअपद्वारे ' Confirm ' असा मॅसेज करेन. तसेच सापळा पथकातील अंमलदार कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने धारावी पोलीस ठाण्याच्या आजूबाजूला उभे राहतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माइया शर्टाच्या आतिल बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. चव्हाण असे लोकसेवक पो.नि. विजय माने यांना भेटण्याकरीता धारावी पोलीस ठाणे येथे गेलो. त्यावेळी लोकसेवक पो.नि. विजय माने हे धारावी पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावरील रूम न. ०१ मध्ये बसले होते. त्यावेळी त्यांना भेटलो त्यांनी लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माइया जिन्स पॅन्टच्या पुढील ब्राजूच्या उजव्या खिश्यातून काढली असता त्यांनी सदरची रक्कम प्लॅस्टिकच्या पिश्वीतून काढून लोकसेवक माने यांच्या समोर धरली असता, त्यांनी नमूद रक्कम खाकी पाकीट पुढे करून त्यामध्ये ठेवून ते पाकीट त्यांच्या टेबलाच्या ड्राव्हरमध्ये ठेवले.

त्यानंतर मी माइया विरूध्द दाखल गुन्हयाबाबत पुन्हा चर्चा करून लागलीच त्यांच्या कार्यालयातून बाहेर येऊन मोबाईल फोनमधील व्हॉटसअपद्वारे ' Confirm ' असा मॅसेज पोनि गुर्जर यांना करून पूर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी तात्काळ सापळा पथकातील अंमलदार नमुद कक्षात आले व त्यांनी पो.नि. विजय माने यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना जागीच अटकावून ठेवले.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी माइया शर्टाच्या आतील बनियनला लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला. पोनि गुर्जर यांनी लोकसेवक पो.नि. माने यांना स्वत:ची ओळख पचासंमक्ष सागितली. त्यानंतर त्यांनी मला लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी सांगितले की, सदरची रक्कम टेबलाच्या ड्राव्हरमध्ये ठेवली आहे. लोकसेवक पो.नि. विजय माने यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

लोकसेवक पो.नि. विजय शिवदास माने यांनी माइया विरूध्द धारावी पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल गुन्हा क्र. १२८६/२०२२, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८ व ३४ भादंवि गुन्हायामधील कलमांपैकी कलम ४२० ठेवून इतर कलमे काढण्याकरीता रु १,००,००० किंवा आयफोन मोबाईल अशी लाचेची मागणी करून तडजोडी अंती रु ४०,०००/– स्विकारण्याचे मान्य करून नमुद लाचेची रक्कम रु ४०,०००/– आज दि. २४/०३/२०२३ रोजी माझे कडून स्विकारली म्हणून माझी लोकसेवक पोलीस निरीक्षक विजय शिवदास माने यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक पो.नि. विजय शिवदास माने यांचेशी कोणतेही पूर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचा व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतून वाचून हिंदीतून समजावून सांगण्यात आंली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( संतोष कमलाकर गुर्जर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

NAWAD ANSARI

29 8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

(९८)

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व रोजी फिर्यादी श्री नवाब अब्दुल समद अन्सारी यांचे विरुद्ध धारावी पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंद असलेला गु.र.क्र. ९२८६/२०२२ मधील कलम कमी करण्यासाठी यातील लोकसेवक पोलीस निरीक्षक विजय माने यांनी फिर्यादी यांचेकडे रुपये एक लाख किंवा आयफोन मोबाईल स्वरुपात लाचेची मागणी केली तडजोडी अंती लोकसेवक श्री. विजय माने यांनी फिर्यादी कडून रु ८०,०००/- लाचेची मागणी करून ती स्विकारल्या नंतर त्यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून लोकसेवक श्री. विजय माने यांचे विरुद्ध भ्र.प्र.अधि. १९८८ कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री संतोष गुर्जर, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................ (3) Transferred to P.S ........................, District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

संपूर्ण नाव Name संतोष गुर्जर
पदनाम Rank पोलीस निरीक्षक,
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

Code No. of I. O. ............................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**